

**SOLAPUR UNIVERSITY, SOLAPUR**
**&**
Rayat Shikshan Sanstha's
**Laxmbai Bhaurao Patil**
**Mahila Mahavidyalaya, Solapur**
(Maharashtra)
**Department of History & IQAC**
**Jointly Organized**

An Interdisciplinary International Seminar
on

# LIFE AND WORK OF DR. BABASAHEB AMBEDKAR

**Rayat Mauli**

Part - II

17th & 18th February 2017






Scanned by CamScanner

अनुक्रमणिका


डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे चलनविषयक विचार– प्रा.डॉ. विकास कदम, प्रा.डॉ. बाळकृष्ण माळी | २४१

७६) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे चळवळीतील आंबेडकरी जलसे - विशाल अप्पासाहेब चव्हाण, शुभम प्रसाद जडल | २४४

७७) आंबेडकर चळवळीतील आंबेडकरी जलसे - विशाल अप्पासाहेब चव्हाण, शुभम प्रसाद जडल | २४७

७८) डॉ. बाबासाहेबांची प्रेरणा घेऊन दलित रंगभूमीचा उध्दार - कु. किरण ज्ञानेश्वर कांबळे, तारीक लतिफ तांबोळी | २५१

७९) डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि राष्ट्रवाद - सौ. देशमुख सुजाता सचिन | २५६

८०) डॉ. बाबासाहेब आंबेडकर - दलित चळवळ व धर्मांतर चळवळीचे क्रांतीपुत्र - प्रा. सौ. अनुराधा प्रशांत पवार (गोरे) | २६१

८१) हिंदु कोड बिल आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर - प्रा.डॉ. प्रशांत नलावडे | २६३

८२) हैद्राबाद संस्थानातील शैक्षणिक परिस्थिती व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान – प्रा. बंडे धनराज वैजनाथराव | २६७

८३) Dr. Babasaheb Ambedkar's Economic Thought - Prof. Lavate M.G. | २७१

८४) Contribution of Dr. Babasaheb Ambedkar in Education - Dr. Prajakta prakash joshi | २७४

८५) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्रीविषयक विचार – राजू विष्णू भोकटे | २७६

८६) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा शिक्षणविषयक दृष्टीकोन–एक नवा दृष्टीक्षेप
– प्राचार्य डॉ. धम्मपाल रेवण माशाळकर | २८०

८७) डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि सायमन कमीशन - प्रा.राजेंद्र गायकवाड | २८३

८८) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे मराठवाड्यातील सामाजिक जाणीव जागृतीचे कार्य - प्रा.डॉ.होनराव गणेश काशिनाथ | २८७

८९) THE MAKER OF MODERN INDIA: DR. BABASAHEB AMBEDKAR
- Mrs. Jyoti Nagnath Waghmare | २९१

९०) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक कृषी धोरण – डॉ. रावसाहेब ढवण | २९३

९१) एक दृष्टा अर्थशास्त्रज्ञ– डॉ. बाबसाहेब आंबेडकर – प्रा. राधाकिसन पांडुरंग मुठे | २९६

९२) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा ओबीसी बाबतचा दृष्टिकोन – प्रा. भाऊसाहेब खंडू सांगळे | २९९

९३) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे हिंदू कोड–बिल – डॉ. विजय रेवजे | ३०२

९४) मूलगामी क्रांतीचे अग्रदूत : डॉ. बाबासाहेब आंबेडकर – प्रा. दिलीप महादू कोने | ३०६

९५) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कामगारविषयक विचार व कार्ये – डॉ. शर्वरी रत्नाकर कुलकर्णी | ३०९

९६) भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार : डॉ. बाबासाहेब आंबेडकर – प्रा. मल्लिनाथ अंजुनगीकर | ३१४

९७) डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे शेती व शेतकरी विषयक कार्य व विचार – प्रा.गव्हाणे रमाकांत बबनराव | ३१७

९८) डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि सामाजिक समतेचा लढा – प्रा.मरे आर. एस. | ३२०

९९) महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक चळवळीतील योगदान – रसाळ डी.के. | ३२४

१००) "Dr. Bhimrao Ambedkar's Thought & It's Impact On Indian Economy"
- Dr.Santosh Babare, Rajendra More | ३२७

१०१) A Study of Dr. Babasaheb Ambedkar's Economic and Finance Role In India
- Professor Sunil Tukaram More | ३३०

१०२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर व दलित चळवळ – प्रा.डॉ.चौधरी डी.एम. | ३३२

१०३) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक विचार – प्रा. परमेश्वर हटकर | ३३७

१०४) स्त्री प्रबोधनाचे प्रणेते - डॉ.बाबासाहेब आंबेडकर - डॉ.राजेंद्रसिंह लोखंडे | ३३९

१०५) जातीनिर्मूलनाविषयीचे विचार – डॉ. एम.बी. वाघमारे | ३४३

१०६) सुधारक : डॉ. बाबासाहेब आंबेडकर - प्रा. क्रांती पैठणकर | ३४६

१०७) विभक्त मतदार संघ आणि गांधी - आंबेडकर - पुणे करार - प्रा. डॉ. मानवते उत्तम हुसनाजी


Scanned by CamScanner

ISBN No. 978-81-921752-7-0

# जातीनिर्मूलनाविषयीचे विचार

डॉ. एम.बी. वाघमारे
श्री शिवछत्रपती महाविद्यालय, जुन्नर

जातींचे निर्मूलन : –

१) (Annihilation of Cast)

डॉ. आंबेडकरांनी जातिव्यवस्था आणि जातीयतेच्या परिणामाबद्दल आपल्या पुस्तकांमध्ये आणि केलेल्या भाषणांमध्ये अनेक ठिकाणी खूप लिहिले आहे. त्यांचा पहिला शोधनिबंधही या जातीच्या संदर्भातच होता. म्हणजेच या जातीयतेचे चटके खुद्द त्यांना स्वतःला बसले असल्यामुळे त्यांची लेखणीही धारदार असून सत्यवादी बनली आहे. जातीविषयक प्रश्नांची तात्विक चर्चा त्यांच्या जातीयतेचे निर्मूलन या पुस्तकात सविस्तर मांडली आहे.

अस्पृश्य हे हिंदूच कसे राहतील व हिंदू समाजातील जातिभेद नष्ट करूनच सर्व समाज एकरुप कसा होईल यासाठीच पंजाबमधील एकेकाळच्या हिंदू महासभेच्या कार्यकर्ते असणाऱ्या भाई परमानंद यांनी जात-पात मोडक मंडळ या नावाची संस्था स्थापन केली. हिंदूमहासभा ब्राह्मणाचाच पुरस्कार करत असल्याने अत्यंत आद्विग्न होऊन भाई परमानंद यानी जात-पात मोडक मंडळ स्थापन केले. त्यांना हिंदू समाजरचनेत अमूलाग्र क्रांती घडवून आणून समता व बंधूत्व प्रस्थापित करायची होती. या संस्थेत अनेक विद्वान कार्यकर्ते असून ते आर्य समाविष्ट होते. या जात-पात मोडक मंडळाने मार्च १९३६ साली लाहोर येथे वार्षिक परिषद आयोजित केली होती. बाबासाहेबांनी या परिषदेचे अध्यक्षपद स्वीकारल्यानंतर अध्यक्षीय भाषण तयार केले. तेच भाषण पुढे जातीचे निर्मूलन (Annihilation of Cast) या पुस्करुपाने प्रसिद्ध झाले. डॉ. आंबेडकरांनी आपले भाषण पहिल्यांदा मे १९३६ मध्ये भारतभूषण प्रिंटिंग प्रेसमध्ये (Tracts for the Times No) या शीर्षकाखाली छापले. डॉ. आंबेडकरांनी आपले विचार मांडत असताना प्रथम आपण हे अध्यक्षस्थान का स्वीकारले याविषयी लिहिले आहे.

### डॉ. आंबेडकरांनी अध्यक्षपद का स्वीकारले ?

डॉ. आंबेडकर म्हणतात की, मी धर्मशास्त्राचा वा हिंदूचा टिकाकार आहे. मी हिंदूंना अत्यंत पूज्य वाटणाऱ्या महात्म्याचे पुढारीपण मान्य करीत नाही, मी हिंदूंचा द्वेष करीत नाही, तर त्यांच्यातला मूर्खपणा दाखवणारा एक सत्यवादी कार्यकर्ता आहे. आजपर्यंत मी माझ्याच बांधवांपुढे विचार मांडित आलो आहे; पण मला आज हिंदूंच्या सभांमधून विचार मांडणाची संधी मिळत आहे म्हणून मी अध्यक्षपद स्वीकारले आहे.

### समाजाची मानसिक व आध्यात्मिक गुलामगिरी नष्ट झाली पाहिजे

डॉ. आंबेडकर आपल्या पुस्तकात पुढे म्हणतात की, या देशामधील नेत्यांनी सामाजिक सुधारणेला प्राध्यान दिले पाहिजे. कारण सामाजिक सुस्थिती ही सामाजिक सर्वांगीण प्रगतीची जननी आहे. इ.स. १८६२ साली रशियात भरलेल्या सभेत कार्ल-मार्क्स व फर्डिनांड लॉसेल यांनी ज्या समाजाची स्थिती अनिष्ट आहे. त्याला त्याच्यापासून तारणे महाकठीण आहे. या सिद्धांताचा ऊहापोह केला होता. डॉ. आंबेडकर पुढे म्हणतात की, हिंदू समाजात तर जातिभेद नसते तर हिंदुस्थानातला पारतंत्र्यात दिवस घालवावे लागले नसते. रोमन समाजही सुधारणांच्या पायावरच राजकीय वर्चस्व स्थापू शकला. मार्टिन ल्युथर किंग यानेही धार्मिक सुधारणेचे बंड पुकारले. प्रेषित महंमद पैगंबरानेही अरब



Scanned by CamScanner

ISBN No. 978-81-921752-7-0

लोकांतील अनिष्ट चालीरितींचा नायनाट केला. जनतेला समतेच्या धर्मात आणले. शिवाजीने किंवा गुरु नानकाच्या पूर्वी संतांनी सामाजिक समतेचा लढा दिला म्हणून आपले धैर्य प्रगट करण्यास क्षेत्र मिळाले; पण हिंदूंनी अस्पृश्यांवर हजारो वर्षे अत्याचार केले. पेशव्यांनी तर अस्पृश्यांना चांगले कपडे, चांगले खाणे, अंगावर दागिने घालणे, चांगले घर बांधणे हे नाकारले होते. त्यांना थुंकण्यासाठी गळ्यात मडके, रस्त्यावरचं पायाचे ठसे पुसावेत म्हणून कमरेला बोराटी बांधलेली असे. त्यांना कोणाकडेही न्याय मागता येत नसे आणि म्हणूनच बाबासाहेब म्हणतात समाजाची प्रथम मानसिक व आध्यात्मिक गुलामगिरी नष्ट झाली पाहिजे म्हणजे त्यांची सर्वांगीण सुधारणा घडून येईल.

**धार्मिक, राजकीय व सामाजिक समता आर्थिक सत्तेपेक्षा जास्त प्रभावी आहे**

हिंदुस्थानातील समाजवाद्यांचे असे म्हणणे आहे की, माणूस हा आर्थिक परिस्थितीचा दास आहे. त्याची आर्थिक गुलामगिरी नष्ट झाली पाहिजे. त्याची सामाजिक व धार्मिक गुलामगिरी नष्ट होईल. हे म्हणणे डॉ. आंबेडकरांना मान्य नाही. यासाठी ते म्हणतात की, असे असेल तर भारतातील कोट्याधीश नंग्या फकिरांपुढे का लोटांगणे घेत आहेत? रोमच्या पददलितांना (प्लेबियन) सत्ताधारी (पेट्रिशियन) लोके डोके वर काढू देत नाहीत. त्याचे उदाहरणे ते देतात की, पेट्रोशियन असणाऱ्या डेल्फी देवीच्या गुरवाने कौन्सिलच्या लागेवर नेमणूक करण्यासाठी कधीच पददलितांना कौल देत नसे म्हणूनच आर्थिक सत्ता ही प्रभावी आहे. बहुजन समाजाने बहुजन समाजासाठी राज्यं तंत्र काबीज केले पाहिजे हा जो समाजवाद्यांचा दुसरा सिद्धांत आहे. त्याला डॉ. आंबेडकर विचारतात की, राजसत्ता स्थान करणे ठीक आहे; पण हिंदू समाजातील महार, मराठा, ब्राह्मण वगैरे जाती खांद्याला खांदा लावून राजसत्ता काबीज करतील काय च जातीभेदाचा सैतान आ वासून उभा असताना सामजिक समता स्थापन होईल काय ? तेव्हा पहिल्यांदा सामाजिक समता प्रस्थापित केली, तर हे सर्व उत्तम होईल असे डॉ. आंबेडकरांना वाटते.

**जातिभेदाचे तोटे**

डॉ. आंबेडकर म्हणतात जातिभेदामुळे हिंदुंचे हिंदू समाजाचे व हिंदुस्थानचे खूपच नुकसान झाले आहे तरी देखील तळी आकाशाला भिडवणारे लाखो हरीचे लाल आजही अस्तित्वात आहे. जातिभेद श्रमविभागणीच्या तत्त्वावर आधारलेला आहे. असे म्हणणाऱ्या विद्वानाला बाबासाहेब उत्तर देतात की, श्रमविभागणीत श्रमाची विभागणी झाली आहे आणि जातिभेदात श्रमजिवी लोकांची विभागणी झालेली आहे. शिवाय एकाच अवस्थेत ठेवणे हे त्या कुटुंबाच्या व समाजाच्या आत्मविकासात बाधक आहे.

**वंशशुद्धीबाबत मांडलेले विचार**

जातिभेदाचे समर्थन करणारे विद्वान म्हणतात की, समाजात वंशशुद्धी ठेवण्यासाठी जातिभेद योग्य आहे; पण डॉ. आंबेडकर आपल्या पुस्तकात त्याला उत्तर देतात की, हिंदू समाजातील ब्राह्मण, चांभार, मराठे, महार, मांग हे एकाच वंशाचे असूनही त्यांच्यात शंभर टक्के रक्तशुद्धी सापडणे अशक्य आहे. त्यामुळे जातिभेद म्हणजे वंशभेद असे न होता एकाच वंशातील भेद असे झाले आहे. त्यामुळे रक्तशुद्धीच्या जातिभेदाशी काहीच संबंध नाही.

**हिंदूंना ऐक्याची वाढ व चीड नाही**

हिंदू समाजाला जातिभेदामुळे आर्थिक, राजकीय, सामाजिक शक्ती प्रस्थापित करता आली नाही आणि म्हणूनच हिंदू समाज निःसत्त्व व दूर्बल बनला आहे. हिंदू समाजाला एकच नाव मिळत नाही. हिंदू हे नाव मुसलमानांनी दिले आहे व आतापर्यंत चालत आले आहे. जातिभेदामुळे हिंदुंना ऐक्याची चीड राहिली नाही.



Scanned by CamScanner

ISBN No. 978-81-921752-7-0

**श्रेष्ठ कनिष्ठ दाखविण्यासाठीच हिंदू धर्मग्रंथ लिहिले**

हिंदूंनी समाजात ऐक्य निर्माण व्हावे यासाठी धर्मग्रंथ न लिहिता ब्राह्मण व इतर जाती कनिष्ठ आहेत हे दाखविण्यासाठी शास्त्रपुराणात जन्माच्या कपोलकल्पित कथा दिल्या आहेत. ब्रह्मगंतही गोळक, देवरुखे, कऱ्हाळे, पळशे, चित्पावान यांच्यातही श्रेष्ठ–कनिष्ठ ठरविणाऱ्या कपोलकल्पित कथा ग्रंथात लिहिल्या आहेत. या जातिभेदामुळेच खुद्द शिवाजींना ब्राह्मणामुळे नाक घासावे लागले आहे हे सर्वांना माहित आहे.

**धर्मांतरित हिंदू हिंदूंच्या छातीवर बसतील**

हिंदू धर्माचे अनुयायी असणारे सुमारे दीड कोटी लोक गुन्हेगारी जाती व जंगलवासी या नावाने ओळखले जातात. आपल्या धर्मातील सात कोटी अस्पृश्यांबद्दल हिंदू कधी लाज वाटली नाही तशीच दीड कोटी लोकांबद्दलही लाज वाटली नाही तेव्हा या लोकांना ख्रिस्ती, मुसलमान यांनी आपल्या कळपात नेल्यावर पुढे हेच लोक हिंदुंच्या छातीवर बसतील असा इशाराही डॉ. आंबेडकरांनी हिंदूंना दिला आहे.

**जातिभेदामुळे हिंदूंचे संघटन होत नाही**

बाबासाहेब पुढे म्हणतात की, जातीच्या श्रेष्ठ–कनिष्ठतेच्या मुद्यावरून हिंदू नेहमीच झगडत असतात. पाठारे, प्रभू, सोनार, मराठे, महार इत्यादी जातींना ब्राह्मणांनी खूपच छळले आहे. म्हणून हिंदूंचे संघटन होत नाही आणि परिणामी त्यांना परदेशात झेंडा फडकवता येत नाही.

**चातुर्वर्ण्याधिष्ठित समाज आदर्श नव्हे**

ज्या समाजाची रचना स्वतंत्रता, समता, बंधुभाव या तीन तत्त्वांच्या पयावर झालेली आहे तो समाज आदर्श होय. आर्य समाजास ही कल्पना पसंत नव्हती. त्यांना चातुर्वर्ण्यही आदर्श समाज रचना वाटत होती. कारण चातुर्वर्ण्य हे गुणावर आधारित आहे असे त्यांचे म्हणणे होते. तेव्हा डॉ. आंबेडकर त्यांना उत्तर देतात की, आर्य समाजीस्टांनी गुणावर आधारित हे चार वर्ण ठरविले आहेत. त्यामध्ये असे लाखो लोक सापडतील की त्यांच्यात त्या त्या वर्णाचे सद्गुण नाहीत फक्त हे त्या त्या जातीत जन्मले आहेत म्हणून ते त्या जातीत जन्मले आहेत तेव्हा गुणावर आधारित चातुर्वर्ण्य राहिले आहेत काय ? इतर देशांत एकाच माणसाला ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य यांचा पेशा आलटून पालटून करता येतो; पण चातुर्वर्ण्यात तशी व्यवस्था नाही. म्हणूनच चातुर्वर्ण्याधिष्ठित समाज हा आदर्श समाज नाही.

डॉ. आंबेडकर पुढे म्हणतात, मला चातुर्वर्ण्याबद्दल मनस्वी चीड आहे. माझ्या अणुरेणूत त्याबद्दल तिटकारा उत्पन्न झालेला आहे. कारण चातुर्वर्ण्यातूनच पुढे जातिभेद निर्माण झाले आहेत. मग चातुर्वर्ण्याची मातब्बरी का मानावी? समाजाची रचना चातुर्वर्ण्यात का करावी ! माणसांच्या अंगात जितके गुण व दुर्गुण असतील तेवढ्यामध्ये विभागणी केली पाहिजे पण हे शक्य नाही. चातुर्वर्ण्यामुळे हिंदू समाजाची सामाजिक, धार्मिक, आर्थिक व राजकीय शक्ती खच्ची होऊन निःसत्व झाली आहे. उलट त्या काळात बहुजनाने चातुर्वर्ण्याची चौकट खिळखिळी केली त्या काळात हिंदुस्थानची प्रगती झाली आहे. मौर्यांच्या काळात हिंदुस्थान देश सर्व दृष्टीने प्रभावशाली व वैभवशाली होता.

**हिंदू समाज कोणत्या अवस्थेत आहे याचा विचार करावा**

चातुर्वर्ण्यावर आणि जातिभेदावर हजारो वर्षापासून हल्ले होत असेल तरी हिंदू समाज अद्याप अस्तित्वात आहे. ही विचारसरणी प्रकट करणारे अनेक हिंदू विद्वान आहेत. डॉ. राधाकृष्णन हे त्यापैकीच एक होत. त्यांचा चातुर्वर्ण्य अस्तित्वात आहे हा दावा खोटा असून फक्त जातिभेद व हिंदू समाज अस्तित्वात आहे हे म्हणणे खरे आहे. हिंदू समाज जातिभेदामुळे हीत, दीन व गुलामी मनोवृत्तीने जीव मुठीत धरून जगत आलेला आहे. त्यामुळे हिंदू समाज



Scanned by CamScanner

ISBN No. 978-81-921752-7-0

कोणत्या अवस्थेत आहे याचा विचार केला पाहिजे.

**मिश्रविवाह करून नवसमाज निर्माण व्हावा**

चातुर्वर्ण्य व जातिभेद हिंदू समाजाला आत्मपरिक्षणासाठी पोषक नाही. त्यामुहे हे समूळ नष्ट करून हिंदू समाजाची पुनर्रचना करणे आवश्यक आहे. त्यासाठी मिश्र पाहिजे असा विवाह जर घडवुन आणायचे असतील तर हिंदूंच्या मनात असलेल्या धार्मिक कल्पना व धार्मिक ग्रंथांचे प्रामाण्य समूळ नष्ट करणे आवश्यक आहे. गौतम बुद्धांनी व गुरुनानकांनी हे वेदादी ग्रंथांचे प्रामाण्य झुगारून दिल्यामुळेच समाज पुनर्रचनेचे कार्य सफल झाले.

**चातुर्वर्ण्य नष्ट करण्यासाठी चळवळ घालवावी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात जातिभेद नष्ट करण्यासाठी रोटीबेटी व्यवहार झाले पाहिजेत हे जातपात मोडक मंडळाचे ध्येय असले तरी जातिभेद नष्ट करण्यासाठी या गोष्टी सर्वस्वी समर्थ नाहीत. जोपर्यंत चातुर्वर्ण्याचे धोतांड अस्तित्वात आहे तोपर्यंत रोटीबेटी व्यवहार होऊनही समाजात जातिभेद अस्तित्वात राहतील म्हणून हिंदूंच्या मनात रुढ झालेल्या देववतार ब्राह्मण श्रेष्ठ, ब्राह्मणेतर कनिष्ठ वगैरे धार्मिक कल्पना व भावना नष्ट केल्या पाहिजेत. वेद, स्मृती हे ग्रंथ ईश्वरनिर्मिती असून ते वंदनीय आहेत म्हणून सर्व प्रकारचे धार्मिक प्रामाण्य प्राणांतापर्यंत मान्य केले पाहिजे ज्या ज्या भावना आहेत त्या नष्ट केल्या पाहिजेत. त्यासाठी जातपात मोडक मंडळाने सर्व हिंदुस्थानात चळवळ चालवली पाहिजे

शेवटी बाबासाहेब म्हणतात हिंदू लोकांपुढे होत असलेले माझे हे भाषण शेवटचे आहे कारण मी हिंदू धर्माचा त्याग करणारा आहे. मंडळाच्या भावी कार्यक्रमात मला भाग घेता येणार नाही. तथापि, मंडळाची जातिभेद नष्ट करण्याची चळवळ यशस्वी होवो, अशी त्यांनी इच्छा व्यक्त केली आहे. Who were the shudras, how they came to be fourth varna in indo aryan society.

**Ref.**

Dr.B.R. Ambedkar, Annihilation of Caste

□□

Scanned by CamScanner

राष्ट्रीय मूल्यांकन एवं प्रत्यायन परिषद
विश्वविद्यालय अनुदान आयोग का स्वायत्त संस्थान

**NATIONAL ASSESSMENT AND ACCREDITATION COUNCIL**

*An Autonomous Institution of the University Grants Commission*

# Certificate of Accreditation

*The Executive Committee of the*
*National Assessment and Accreditation Council*
*on the recommendation of the duly appointed*
*Peer Team is pleased to declare the*
*Rayat Shikshan Sanstha's*
*Laxmibai Bhaurao Patil Mahila Mahavidyalaya*
*Solapur, affiliated to Solapur University, Maharashtra as*
*Accredited*
*with CGPA of 3.03 on four point scale*
*at A grade*
*Valid up to January 04, 2018*

*Date : January 05, 2013*

*Director*

EC/62/RAR/077

ISBN No. 978-81-921752-7-0

Scanned by CamScanner